**प्रेस नोट दिनांक २०/०५/२०१९**

**विश्रांतवाडी पोलीस स्टेशन,पुणे**

**गरिबीला कंटाळुन झडपट श्रीमंत होण्यासाठी ए.टी.एम. फोडण्याचा प्रयत्न करणा-या इसमाला विश्रांतवाडी पोलीसांनी रंगेहात पकडले.**

दिनांक १८/५/२०१९ रोजी रात्रौ २१/०० ते ९.०० वा दरम्यान वन मोबाईल वरील पो.ना वामन सांवत,पो.शि प्रफुल्ल गाडे व धानोरी मार्शल वरील पो.ना विनायक मुधोळकर असे विश्रांतवाडी पोलीस स्टेशन हद्दीत रात्र गस्त पेट्रोलींग करित असतांना रात्रौ १.५५ वा सुमारास पंजाब नॅशनल बॅंक ए.टी.एम. टिंगरेनगर लेन नंबर ७ विश्रांतवाडी पुणे येथे आले असताना ए.टी.एम. मध्ये एक इसम तोंडाला टॉवेल व हातात हॅन्डग्लोज घालुन दिसला, पेट्रोलींग गाडीची चाहुल लागताच ए.टी.एम.च्या आत मध्ये लपु लागल्याचे दिसल्याने लागलीच गाडीतुन उतरुन सावधपणे ए.टी.मध्ये जावुन सदर इसमास ताब्यात घेतले. ए.टी.एम.चे व्यवस्थीत निरीक्षण करता ए.टी.एम. कक्षातील कॅमे-याच्या वायरी तुटलेल्या दिसल्या सदर इसमास ताब्यात घेऊन त्यांनी पोलीसांनी नियंत्रण कक्षाला कळवुन पोलीस मदत मागितली असता सदर घटनास्थळी नाईट राऊंड अधिकारी पोलीस उप-निरीक्षक जीवन बोरसे तात्काळ मदतीस आले.त्यांनी सदर इदसमा कडे चौकशी केली असता सदर इसमाने आपले नाव पंकज सयाजी राऊत वय ३४ वर्षे रा . पिपंळगाव देपा, ता.संगमनेर जिल्हा अहमदनगर असे सांगितले.त्याच्याकडे अधिक चौकशी करता त्याने गरीबीला कंटाळून झटपट श्रीमंत होणेसाठी ए.टी.एम. फोडून पैसे चोरण्यासाठी ए.टी.एम.मधील वायरी तोडल्याचे सांगितले .सदर इसमाकडे कमरेला लपवलेले वायर कटर मिळुन आले.सदर इसमावर विश्रांतवाडी पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नंबर १८५/२०१९ भा.द.वि कलम ३८०,५११ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कामगिरी अप्पर पोलीस आयुक्त सो।, गुन्हे पुणे शहर, प्रभारी चार्ज पुर्व प्रादेशिक विभाग श्री .अशोक मोराळे सो। यांच्या मार्गदर्शना खाली, मा पोलीस उप-आयुक्त सो परिमंडळ ४ पुणे शहर श्री .प्रसाद अक्कानवरु, मा.सहा. पोलीस आयुक्त श्री देविदास पाटील,खडकी विभाग पुणे व वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरुण आव्हाड यांच्या मार्गदर्शना खाली पोलीस उपनिरीक्षक जीवन बोरसे, पो.ना .वामन सावंत,पोना विनायक मुधोळकर व पो.शि प्रफुल्ल गाडे विश्रांतवाडी पोलीस स्टेशन पुणे यांनी केली आहे.